# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 03.06.2025** **वार- मंगळवार**

---

**<u>शिवराज सिंहचौहान</u>**

पिके आणि  कीडरोगमुक्त रोपांची निर्मिती करुन उत्पन्न आणि  उत्पादनात वाढ व्हावी  तसेच  देशातील लोकांना रोगमुक्त आणि स्वच्छ अन्न मिळावे या उद्देशाने  संपूर्ण देशात स्वच्छ वनस्पती कार्यक्रम म्हणजे क्लीन प्लांट प्रोग्राम राबविण्यात येणार आहे. यासाठी देशात नऊ ठिकाणी प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहेत. त्यातील तीन प्रयोगशाळा महाराष्ट्रात उभारण्यात येणार असून, पैकी द्राक्षासाठी पुण्यात प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहे, अशी माहिती,  केंद्रीय कृषी, शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज पुण्यात दिली. शिवाजीनगर इथं कृषी महाविद्यालयात आंतराष्ट्रीय कृषी हॅकेथॉन या उपक्रमाच्या समारोप समारंभात ते बोलत होते. या उपक्रमातील विजेत्यांना यावेळी पारितोषिके देण्यात आली. जॉयस एआय सोल्युशन यांना 'कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता' या विषयासाठी 25 लाखांचं प्रथम पारितोषिक देण्यात आलं. जेन्स सिक्स स्मार्ट प्रॉडक्ट लिमिटेड आणि टू राईस कंपनीला उपविजेतेपद विभागून देण्यात आलं. या कार्यक्रमाला  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते.

तत्पूर्वी, शिवराज सिंह चौहान यांनी आज नारायणगाव इथल्या कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट दिली आणि शेतकऱ्यांशी संवाद साधला. कृषी क्षेत्रात होणारं संशोधन शेतकऱ्यांच्या आवाक्यात असावं यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**जनरलचौहान**

यापुढील काळात कोणत्याही युध्दात मानवी सहभाग कमी होऊन प्रामुख्याने शस्त्रांनी तंत्राआधारित युध्द होईल. असं प्रतिपादन देशाचे सरसेनाअध्यक्ष जनरल अनिल चौहान यांनी आज पुण्यात केलं. 'भविष्यातील युद्धं आणि युद्धकौशल्य' या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या, 'संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या विशेष व्याख्यानात ते बोलत होते. ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारताने अचूकतेने केलेल्या हल्ल्यांविषयी बोलताना ते म्हणाले की, ऑपरेशन सिंदुरच्या माध्यमातून आपल्या हवाई दलाने सर्वोत्तम क्षमता सिद्ध करताना इतिहास घडवला. भविष्यात कृत्रिम बुध्दिमत्ता आणि रोबोटिक्स यांचा युद्धाच्या तंत्रज्ञानात मोठ्या प्रमाणात वापर होणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केलं.

**'आयसर' -माशेलकर**

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांना भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था अर्थात आयसर संस्थेच्या वतीन 'मानद डॉक्टरेट' देऊन गौरविण्यात आलं. 'आयसर' चे संचालक डॉ. सुनील भागवत यांच्या हस्ते दूरस्थ माध्यमातून डॉक्टर माशेलकर यांना ही पदवी प्रदान करण्यात आली. याच कार्यक्रमात ३५२ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्यात आली.

**पीएमआरडीए**

पुणे महानगर क्षेत्रातील पायाभूत सुविधा विकसित करण्याबरोबरच वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने प्रस्तावित १५० रस्त्यांसाठी जमीन संपादनाची प्रक्रिया पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अर्थात पीएमआरडीए तर्फे सुरू करण्यात आली आहे. तसेच, ८५ हेक्टर क्षेत्रावरील आरक्षित भूखंडासाठी

भूसंपादन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील मावळ, हवेली, मुळशी आणि शिरूरसह अनेक प्रमुख तालुक्यातील रस्त्यांचा यामध्ये समावेश असून, पुणे महानगर क्षेत्राच्या ६ हजार २४६ चौरस किलोमीटर क्षेत्रफळात नियोजित शहरी विकास करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

**<u>फायरऑडिट</u>**

पुणे शहरातील रुग्णालयांमध्ये उपचारांसाठी जाणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी शहरातील महापालिकेच्या रुग्णालयांसह खासगी रुग्णालयांचं अग्निसुरक्षाविषयक सर्वेक्षण करण्याचे आदेश संबधित विभागांना दिले असल्याची  माहिती महापालिकेचे नवनियुक्त आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली.

**<u>पिं-चिंमनपा-सफाईकर्मचारी</u>**

पिंपरी चिंचवड  महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे सफाई सेवकांसाठी, ‘स्वच्छ भारत अभियाना'अंतर्गत ‘आता थांबायचं नाय’  या मराठी चित्रपटाचा विशेष खेळ आज आयोजित करण्यात आला होता. सफाई सेवकांमध्ये नवचैतन्य निर्माण करणे, कामाबाबत सजगता वाढवणे आणि  त्यांच्या कार्याला प्रेरणा देणे, हा यामागचा मुख्य उद्देश असून,  या उपक्रमामुळे सफाई सेवकांनाही त्यांच्या कार्याचा अभिमान वाटेल, आणि अधिक जोमाने काम करण्यासाठी प्रेरणा मिळेल, असं पालिकेचे उपायुक्त  सचिन पवार याप्रसंगी बोलताना म्हणाले. यावेळी सर्व उपस्थितांनी अभिनेते भरत जाधव यांच्या उपस्थितीत स्वच्छतेची शपथ घेतली.

**<u>‘ज्ञानशक्ती’ -बीजसंवर्धन</u>**

नागरिकांचे आरोग्य टिकवणे, पर्यावरणपूरक शेतीला चालना देणे आणि  पारंपरिक देशी वाणांचे संवर्धन करणे या उद्देशाने ‘ज्ञानशक्ती विकास वाहिनी’  संस्थेमार्फत आंबेगाव तालुक्यात शेतकऱ्यांना देशी भाजीपाला आणि  कडधान्यांच्या मोफत बियाण्यांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे यांच्याकडून हे बियाण उपलब्ध झालं आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल 34 आणि किमान 23 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली. दिवसभर आकाश मुख्यतः निरभ्र होतं. उद्या देखील अशाच स्वरूपाचं हवामान असण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतासह, नमस्कार.**